चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

१७ फेब्रुवारी, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक १६/०२/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **चंद्रपुर शहर, रामनगर, बल्लारशाह, भद्रावती, भिसी, पाथरी** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण ०७ गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन ०७ आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयात एकुण **२,०५,४००/—रू.** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

———————————————————————————

# बल्लारशाह पोलीसांची दारूसाठयावर धाड

- मौजा विसापुर येथुन ११० पेटया दारूचा मुददे्माल हस्तगत.
- एका दुचाकीसह ०३ आरोपीस अटक

दिनांक १७/०२/२०१९ रोजी पोलीस स्टेशन बल्लारशाह येथील पोलीस पथकास गोपनीय माहिती मिळाली की, मौजा विसापुर येथे एका इसमाच्या घरी मोठया प्रमाणात अवैध दारू विक्रिकरीता साठवुन ठेवलेली आहे. अशी माहिती मिळताच बल्लारशाह येथील पोलीस पथक तात्काळ मौजा विसापुर येथे पोहचुन मिळालेल्या माहितीप्रमाणे एका इसमाच्या घराजवळ पोहचले असता त्याठिकाणी एक मोपेड दुचाकी मिळुन आली सदर वाहनास ताब्यात घेवुन वाहनाची झडती घेतली असता वाहनाच्या डिक्कीमध्ये १०० देशी दारूच्या निपा किं. १०,०००/—रू चा माल मिळुन आला. सोबतच घराच्या भोवतालच्या परिसराची झडती घेतली असता त्याठिकाणी ११० पेटया देशी दारूचा माल किं. ११,१०,०००/—रू, आणि दुचाकी किं. ६०,०००/—रू. असा एकुण ११ लक्ष ७० हजाराचा मुददमाल मिळुन आला आहे. सदरचा मुददे्माल हस्तगत करून आरोपी नामे अविनाश सोनटक्क, शेख शब्बीर, देवा भोजेकर सर्व रा. विसापुर यांना अटक करून पोलीस स्टेशन बल्लारशाह येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही डॉ. महेश्वर रेडडी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनाखाली बल्लारशाह पोलीस स्टेशन प्रभारी पोनि. श्री. भारती यांचे नेतृत्वात सपोनि धोबे, पोउपनि जाधव, पोहवा खनके, पोना प्रशांत, राकेश, पोशि दिलीप, कुंदावार यांनी पार पाडली.

———————————————————————————————————

चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
१७ फेब्रुवारी, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# ५ महिला पिडीतांची अनैतीक व्यापारातुन मुक्तता करीत...

## अनैतीक व्यापार चालविणारी महिला व तिच्या मुलाविरूध्द पोलीसांची कार्यवाही

दि. १७/०२/२०१९ रोजी स्थानीक गुन्हे शाखेचे पोलीस पथक यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून सरकार नगर येथे सगीरा अपार्टमेंट मधील एस – ३ या फ्लॅट मध्ये एक स्त्री स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता स्त्रिया पुरवुन त्यांचेकडुन देहव्यापार करवुन घेत आहे, अशा माहितीवरून सरकारगनर येथे जावुन मिळालेल्या माहीतीची खात्री करण्याकरीता पंटर/बोगस ग्राहक पाठवुन खात्री करून पोलीस पथकासह १६:०० वा. सुमारास सदर फ्लॅट वर छापा टाकला असता फ्लॅट मध्ये एक महिला तिच्या मुलासह मिळुन आली. पोलीस पथकाने त्याना विचारपुस करून फ्लॅटची पाहणी केली तर त्याच फ्लॅटमध्ये ५ पिडीत महिला मिळुन आल्या. पोलीस पथकाने कार्यवाही दरम्यान घेतलेल्या झडतीमध्ये एकुण २ मोबाईल फोन, नगदी रोख व इतर साहित्य असा एकुण १९,९१०/–रू. चा माल जप्त करण्यात आला आहे. पाचही पिडीत महिला हया प्रौढ आहेत. या पिडीत महिलांची सविस्तर चौकशी करून त्यांची सुटका करण्यात आली असुन फ्लॅटमध्ये मुलासह राहणारी महिला यांचे विरूध्द अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा अन्वये कार्यवाहीची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कार्यवाही ही डॉ. महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाख प्रभारी पोनि. श्री. ओ. जी. कोकाटे यांचे सह पो.उप नि. जितेंद्र वैरागडे, शकंर मुटेकर , स.फौ. नितीन जाधव, पोहवा. विजय संगीडवार, ना.पो.शि.अमजद खान, अविनाश दशमवार, पो.शि. विनोद जाधव, प्रफुल मेश्राम, जावेद सिददीकी, म.पो.शि.सिमा सावळे, प्रिया पोले, सपना साखरे, भारती खरकाटे यांनी पार पाडली.

———————————————————————————————————